# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः05.06.2024** **वारःबुधवार**

---

1. अतिशय चुरशीच्या लोकसभा निवडणुकीत एनडीएला बहुमत, भाजपा सर्वात मोठा पक्ष,
2. राज्यात मतदारांचा संमिश्र कल, प्रमुख उमेदवारांना पराभवाचा धक्का, बहुचर्चित बारामती जागेवर सुप्रिया सुळे यांचा विजय,
3. नवीन ऊर्जा, नवीन उत्साह आणि नवीन संकल्प घेऊन पुढे जाणार – पंतप्रधानांचं प्रतिपादन
4. हा जनतेचा आणि लोकशाहीचा विजय असल्याचं  काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांचं मत आणि
5. राज्यात तीन ते चार दिवसांत मोसमी पाऊस दाखल होणार, स्थिती अनुकूल असण्याचे हवामान विभागाकडून संकेत.

**निवडणूक निकाल**

2024 च्या लोकसभा निवडणुकीत सत्ताधारी राष्ट्रीय लोकशाही आघाडीनं 292 जागांवर विजय मिळवला असून, इंडि आघाडीनं 231 जागांवर विजय मिळवला आहे. भाजपा सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. आतापर्यंत हाती आलेल्या निकालांनुसार प्रमुख राष्ट्रीय पक्षांचं संख्याबळ असं आहे :

भारतीय जनता पक्ष – 240, कॉंग्रेस पक्ष – 98, समाजवादी पक्ष – 37, तृणमूल कॉंग्रेस – 29, द्रमुक – 22, तेलुगु देसम – 16 आणि इतर 18 उमेदवार विजयी झाले आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी वाराणसीतून, गृहमंत्री अमित शाह गांधीनगरमधून, संरक्षणमंत्री राजनाथसिंह लखनौमधून, तर कॉंग्रेस नेते राहुल गांधी वायनाड आणि रायबरेलीमधून विजयी झाले आहेत. अभिनेत्री कंगना रनौट हिमाचल प्रदेशातील मंडी इथून तर, अनुरागसिंघ ठाकूर हमीरपूर मतदारसंघातून, आणि हेमामालिनी  मथुरा इथून विजयी झाले आहेत. केंद्रीय मंत्री स्मृती इराणी यांना मात्र अमेठी मतदारसंघात पराभव पत्करावा लागला.

**देश-निकाल**

काही राज्यनिहाय निकाल असे आहेत –

- **अंदमान निकोबार** मधील एकमेव जागा भाजपानं जिंकली आहे.
- **आंध्र प्रदेशात** वाय  एस आर कॉंग्रेस पक्षाने 4 जागा जिंकल्या असून, भाजपने 3 जागा मिळवल्या आहेत.
- **अरुणाचल प्रदेशातील** दोनही जागांवर भारतीय जनता पक्षाचे उमेदवार निवडून आले आहेत.
- **आसाम** मध्ये 14 जागांपैकी 9 जागांवर भाजपने विजय मिळवला असून, कॉंग्रेस पक्षाला 3 जागा मिळाल्या आहेत.

- **<u>बिहार</u>** मध्ये भाजपा आणि संयुक्त जनता दलात चुरस दिसून आली. भाजपने 11 तर संयुक्त जनता दलाने 12 जागांवर विजय मिळवला.
- **<u>गुजरातमध्ये</u>** भाजपनं निर्विवाद वर्चस्व राखत 25 जागा पटकावल्या आहेत. काँग्रेस एका जागेवर समाधान मानावं लागलं आहे.
- **<u>मध्य प्रदेशात</u>** देखील सर्व 29 जागांवर भाजपने विजयी पताका फडकावली आहे.
- **<u>उत्तर प्रदेशात</u>** भारतीय जनता पक्षाला समाजवादी पक्षाने अटीतटीची झुंज देत 37 जागांवर विजय मिळवला तर, भाजपला 33 जागा मिळाल्या.
- **<u>राजस्थानात</u>** भाजपाने 14 जागांवर विजय मिळवला असून, हरयाणामध्ये भाजपा 5 तर कॉंग्रेस पक्षाने 4 जागांवर विजय मिळवला.
- राष्ट्रीय राजधानी क्षेत्र **<u>दिल्ली</u>** अर्थात एनसीआर दिल्लीतून सर्व जागा भाजपाने जिंकल्या आहेत.
- या निवडणुकीत **<u>केरळमध्ये</u>** भारतीय जनता पक्षाने एका जागेवर विजय मिळवत आपलं खातं उघडलं. इथे, कॉंग्रेस पक्षाने 14 जागांवर विजय मिळवला.

**<u>राज्य-निकाल</u>**

महाराष्ट्रात 48 मतदारसंघांपैकी महाविकास आघाडीला 30, तर महायुतीला 17 जागा मिळाल्या आहेत. 13 मतदारसंघात काँग्रेस तर 9 ठिकाणी भाजपानं विजय मिळवला आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला 9 तर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाला 8 आणि शिवसेनेला 7 जागा मिळाल्या असून, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला 1 जागा मिळाली आहे. एक अपक्ष उमेदवार विजयी झाला आहे.

- **<u>अहमदनगर</u>** मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे निलेश लंके यांनी त्यांचे प्रतिस्पर्धी भाजपाचे सुजय विखे पाटील यांच्यावर 7 हजार 407 मतांनी मात करत विजय मिळवला.
- **<u>अमरावतीमध्ये</u>** काँग्रेसचे बळवंत वानखेडे यांनी भाजपाच्या नवनीत राणा यांचा पराभव केला.
- **<u>साताऱ्यात</u>** भाजपाचे छत्रपती उदयनराजे भोसले विजयी झाले आहेत.
- **<u>बीडमधून</u>** भाजपाच्या पंकजा मुंडे यांना पराभूत करत शरद पवार गटाचे बजरंग सोनवणे विजयी झाले आहेत.
- प्रतिष्ठेच्या ठरलेल्या **<u>बारामती</u>** मतदारसंघात, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या सुप्रिया सुळे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या सुनेत्रा पवार यांचा पराभव करत विजय मिळवला.
- **<u>नाशिक</u>** मतदारसंघातून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे राजाभाऊ वाजे निवडून आले आहेत. महायुतीच्या डॉक्टर भारती पवार दिंडोरी इथून आणि हेमंत गोडसे नाशिकमधून पराभूत झाले.
- **<u>बुलढाणा</u>** मतदारसंघात शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार प्रतापराव जाधव यांनी त्यांचे निकटचे प्रतिस्पर्धी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नरेंद्र खेडेकर यांचा पराभव केला.
- **<u>रत्नागिरी-सिंधुदुर्ग</u>** मतदारसंघात भाजपाचे उमेदवार नारायण राणे विजयी झाले.
- **<u>नंदुरबार</u>** लोकसभा मतदारसंघात काँग्रेसचे उमेदवार गोवाल पाडवी यांनी भाजपाच्या हीना गावीत यांना पराभूत केलं.
- **<u>पालघर</u>** मतदारसंघात भाजपाचे उमेदवार हेमंत सावरा यांना विजयी घोषित करण्यात आलं आहे.

- **<u>जालना</u>** मतदार संघात भाजपाचे विद्यमान खासदार रावसाहेब दानवे यांना पराभव पत्करावा लागला. काँग्रेसचे कल्याण काळे यांनी त्यांच्यावर मात केली.
- **<u>उत्तर मुंबई</u>** मतदारसंघात भाजपाचे उमेदवार पीयूष गोयल विजय झाले, मात्र, **<u>उत्तर मध्य मुंबईत</u>** भाजपाचे उज्ज्वल निकम यांना पराभव पत्करावा लागला. **<u>दक्षिण मुंबई</u>** मतदारसंघात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अरविंद सावंत विजयी झाले आहेत.
- **<u>दक्षिण मध्य मुंबईत</u>** अनिल देसाई यांना विजयी घोषीत करण्यात आलं आहे.
- **<u>रायगड</u>** मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सुनील तटकरे यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अनंत गीते यांच्यावर 82 हजार 784 मतांनी विजय मिळवला.
- **<u>ठाणे</u>** मतदारसंघात शिवसेनेचे नरेश म्हस्के विजयी झाले आहेत.
- **<u>सांगली</u>** इथं अपक्ष उमेदवार विशाल पाटील एक लाखहून अधिक मतांनी विजयी झाले.

**<u>पुणे-मतदारसंघ निकाल</u>**

- **<u>बारामती</u>** मतदारसंघात सुप्रिया सुळे तर **<u>मावळ</u>** मतदारसंघात शिवसेना शिंदे गटाचे श्रीरंग बारणे विजयी झाले.
- **<u>शिरूर</u>** मतदारसंघांत राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार गटाचे उमेदवार डॉक्टर अमोल कोल्हे यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाचे शिवाजीराव आढळराव पाटील यांचा पराभव केला.
- **<u>पुणे शहर</u>** मतदारसंघात भाजपच्या मुरलीधर मोहोळ यांनी कॉंग्रेसच्या रवींद्र धंगेकर यांचा पराभव करत बाजी मारली.

**<u>ओडिशा, आंध्रप्रदेश-विधानसभा</u>**

ओडिशा विधानसभेच्या निवडणुकीत भाजपने 77 जागांवर विजय मिळवला असून तो सर्वात मोठा पक्ष ठरला, सत्तारुढ बिजू जनता दलाला 52 जागा मिळाल्या आहेत. आंध्र प्रदेश विधानसभा निवडणुकीत, तेलुगू देसम पक्षानं 134 जागा मिळवत निर्विवाद वर्चस्व मिळवलं आहे.

**<u>पंतप्रधान</u>**

देशातल्या जनतेनं राष्ट्रीय लोकशाही आघाडी अर्थात एन डी ए वर तिसऱ्यांदा विश्वास दाखवल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मतदारांचे आभार मानले आहेत. जनतेच्या आशा आकांक्षा पूर्ण करण्यासाठी नवी ऊर्जा, नवा उत्साह आणि नव्या संकल्पासह पुढे जाऊ, असं ते म्हणाले. देशाच्या इतिहासात हे क्षण अभूतपूर्व असल्याचं मोदी यांनी नमूद केलं. निवडणूक प्रचारात सहभागी झालेल्या आणि पक्षासाठी जीव झोकून काम करणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांचे मोदी यांनी आभार मानले. दिल्लीतील भाजपच्या मुख्यालयातून त्यांनी काल सर्व कार्यकर्त्यांना संबोधित केलं. यावेळी व्यासपीठावर भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा, राजनाथ सिंह, अमित शाह, विनोद तावडे आदि भाजपाचे ज्येष्ठ नेते उपस्थित होते.

**<u>काँग्रेस-प्रतिक्रिया</u>**

ही निवडणूक केवळ एका राजकीय पक्षाविरुद्ध नव्हती, तर भाजपनं कब्जा केलेल्या यंत्रणेच्या विरुद्ध होती, असं काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी म्हटलं आहे. देश चालवण्यासाठी जनतेला भाजप नको होता हे जनतेनं एकमतानं आणि स्पष्ट सांगितलं असल्याचं त्यांनी काल नवी दिल्लीत सांगितलं. हा भाजपसाठी मोठा संदेश असल्याचं त्यांनी नमूद केलं.

लोकसभा निवडणुकीचा निकाल हा जनतेचा आणि लोकशाहीचा विजय असल्याचं काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी म्हटलं आहे. या निवडणुकीत कोणत्याही एका पक्षाला बहुमत मिळालेलं नसून जनतेचा आदेश मान्य असल्याचं त्यांनी काल नवी दिल्लीत प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितलं.

लोकसभेच्या निकालामुळे देशात परिवर्तनाची प्रक्रिया सुरू झाली आहे. देशपातळीवरचं चित्र आशादायक आहे, अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी काल मुंबईत वार्ताहरांशी बोलताना दिली.

लोकसभा निवडणुकीत काँग्रेस आणि मित्रपक्षांना मिळालेलं यश हे राहुल गांधी यांनी काढलेल्या पदयात्रेचं यश असल्याची प्रतिक्रिया काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी काल मुंबईत बातमीदारांशी बोलताना व्यक्त केली. देशात परिवर्तन होऊ शकत नाही, असं चित्र निर्माण केलं जात होतं. या प्रचाराला जनतेनंच उत्तर दिलं आहे. या देशात जनतेपेक्षा कुणी मोठं नाही, असं नाना पटोले म्हणाले.

देशात नक्की कोणाबरोबर जायला हवं, हे महाराष्ट्रातील जनतेनं दाखवून दिले आहे. राममंदिर बांधूनसुद्धा आयोध्येत भाजपचा उमेदवार पराभूत होतो, यावरून देशात मंदिरांबाबत आस्था आहे, पण त्याला लोक मतं देत नाहीत हेच यामधून स्पष्ट झालं, असं मत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केलं.

**नाशिक-विमान अपघात**

हिंदुस्तान एरॉनॉटीक्स कंपनीचं सुखोई लढाऊ विमान तांत्रिक बिघाडामुळं काल नाशिक जिल्ह्यातील निफाड तालुक्यातील शिरसगांव इथं एका द्राक्षबागेत कोसळलं. विमानातील दोन्ही चालकांनी प्रसंगावधान राखत हवाईछत्रीमधून उडी घेतल्यानं ते दुर्घटनेतून बचावले.

**हवामान**

नैऋत्य मोसमी पाऊस मध्य अरबी समुद्राचा आणखी काही भाग, तसंच गोव्यात पुढे सरकला आहे. येत्या तीन ते चार दिवसांत राज्यात मोसमी पाऊस दाखल होण्यासाठी स्थिति अनुकूल असण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. आज कोकण किनारपट्टीवर सोसाट्याच्या वाऱ्यासहित पाऊस पडण्याची शक्यता असून, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.